संं.फौ.प्र.क्र. ११५३/२०२२
जनता वि. अर्थव
**नि. क्र. ३९ पूढे**

**<u>फिर्यादीतर्फे सा.क्र.२ चा शपथेवर सरतपास विधीज्ञ श्री. एस.एस. यावले यांच्यामार्फत पुढे सुरु.</u>**

६. मी माझ्या कथनाच्या समर्थनार्थ पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. सदर प्रतिज्ञापत्र हे **<u>नि.क्र. ३९</u>** वर आहे व **<u>नि.क्र. ४०</u>** वर दाखल दस्ताऐवज यादीसोबत मी जनता सहकारी बँकेचे ठरावाची सत्यप्रत अभिलेखावर दाखल केली असुन त्यानुसार शिरजगांव कसबा शाखेच्या वतीने मला प्रभारी शाखा व्यवस्थापक म्हणुन मला बँकेच्या कलम १३८ अन्वये प्रकरणात केस चालवले इ. करण्याचे अधिकारी प्रदान केले आहेत. त्या ठरावावर प्रभारी मुख्य अधिकारी यांची सही आहे. त्यास **<u>नि.क्र. ४२</u>** देण्यात आला.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपी आणि त्यांचे वकिल गैरहजर. सबब उलटतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत

**सही/-**
**(एच. एस. सोनार)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (न्या.क्र.२)
चांदूर बाजार

दिनांक – २५.०४.२०२५

सं.फौ.प्र.क्र. ११५३/२०२२
जनता वि. अर्थव
**नि. क्र. ३९ पूढे**

**फिर्यादीतर्फे सा.क्र.२ चा शपथेवर फेरतपास (नि.क्र. ४३ वरील आदेशान्वये) विधीज्ञ श्री. एस.एस. यावले यांच्यामार्फत पुढे सुरु**

**७.** मी दस्ताऐवज यादी **नि.क्र.३** सोबत आरोपी याने फिर्यादी बँकेस दिलेला मुळ धनादेश अभिलेखावर दाखल केला आहे. त्यास **नि.क्र.४४** देण्यात येते. सदर धनादेश हा अनादरित होउन परत आल्याचा बँकेची दि.२०.०५.२०२२ रोजीची मुळ पावती(मेमो) मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.४५** देण्यात येते. आरोपीस फिर्यादी बँकेने वकीलांच्या मार्फत दि. २४.०५.२०२२ रोजी कायदेशीर नोटीस पाठविली होती. त्याची स्थळ प्रत मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर बँकेच्या वकीलांची सही आहे. त्यास **नि.क्र.४६** देण्यात येते. आरोपीस सदर नोटीस ही आर.पी.ए.डी मार्फत पाठविली होती. त्याची पोस्टाची मुळ पावती अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.४७** देण्यात येते. सदर नोटीस आरोपीस मिळल्याबाबतची मुळ पोचपावती अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.४८** देण्यात येते. आरोपीस नोटीस पोहोचल्याबाबतचा ट्रॅक रिपोर्ट अभिलेखावर दाखल असुन त्यास ओळख पटण्याकरिता 'आर्टिकल अ' देण्यात येते. बँकर्स बुक पुरावा कायदा, १८८१ अन्वये प्रमाणित असलेल्या आरोपीच्या कर्जखात्याच्या उता-याची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. सदर प्रत ही तत्कालीन शाखा व्यवस्थापक श्री. सुभाष गुलाबराव मेश्राम यांनी प्रमाणित केली आहे. त्यास **नि.क्र.४९** देण्यात येते.

**आरोपीमार्फत उलटतपासाकरिता पुढील तारखेपर्यंत प्रकरण तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**

दिनांक – ११.०७.२०२५

**(एच. एस. सोनार)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (न्या.क्र.३)
चांदूर बाजार